जन-232-1200(1)

(77)

(१५)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्रमांक :एमओएम/५०८६ दि. ०५.११.२००४.

विषय - महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२

संदर्भ - परिपत्रक क्र.एमओएम/२४४२ दि.२२.१.२००४.

संदर्भित परिपत्रकासोबत जोडलेल्या महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये, अर्जदाराने मागितलेली माहिती पुरविण्याकरिता सार्वजनिक माहिती अधिकाऱ्याने आकारावयाच्या फीच्या रकमेबाबत सविस्तर अनुसूची दिलेली आहे.

तथापि, असे निदर्शनास येते की, सदर अनुसूचिमध्ये दर्शविल्याप्रमाणे फी आकारण्याऐवजी अर्जदारांकडून वेगवेगळी फी आकारली जाते आणि त्यामुळे अर्जदाराकडून आकारलेल्या फीबाबत संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील सादर केले जाते. वास्तव, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियमाची बृहन्मुंबई महानगरपालिकेत अंमलबजावणी करीत असताना आकारावयाच्या फीबाबत सुसूत्रता येण्यासाठी सर्व सार्वजनिक माहिती अधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

(१) उपरोक्त अनुसूचिमध्ये दिलेल्या मार्गदर्शनानुसार, अर्जदाराने मागितलेली माहिती पुरविण्याकरिता आकारावयाच्या फीबाबत अर्जदाराच्या माहितीकरिता सविस्तर तपशिल द्यावा. उदा.माहिती झेरॉक्स करुन द्यावयाची असल्यास एकूण पृष्ठांची संख्या नमूद करावी.

(२) उपरोक्त अनुसूचिमध्ये दिलेल्या मार्गदर्शनानुसार आकारावयाच्या फीव्यतिरिक्त अतिरिक्त फी आकारणे आवश्यक असल्यास महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२च्या कलम(६) मधील तरतूदीनुसार अतिरिक्त फीचा संपूर्ण तपशिल अर्जदारास कळविणे आवश्यक आहे. परंतु, आकारलेली अतिरिक्त फी ही माहिती पुरविण्याच्या प्रत्यक्ष खर्चापेक्षा अधिक असणार नाही याची दक्षता घ्यावी.

(३) अर्जदार आकारलेली फी जमा करण्यास आल्यानंतर ती त्वरीत जमा करुन घ्यावी, जेणेकरुन त्यांच्या वेळेचा अपव्यय टळेल आणि तक्रारीला वाव राहणार नाही.

(४) जमा केलेली रक्कम परिपत्रक क्र.एमओएम/२४८८ दि.३०.१.२००४ मध्ये दिलेल्या निदेशानुसार त्या त्या खात्याच्या 'संकीर्ण जमा' या महसूली अर्थसंकल्पिय सेवाशिर्षाखाली जमा करावी.

सर्व खातेप्रमुख / सहाय्यक आयुक्त (सार्वजनिक माहिती अधिकारी) यांनी उपरोक्त सूचनांची नोंद घेऊन काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

| | | |
|---|---|---|
| सही/-३०.१०.०४ | सही/-०१.११.०४ | सही/-०३.११.०४ |
| (एम.ए. खान) | ( ए. जी. हिरे ) | ( सुब्रत रथो ) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अति.आयुक्त (शहर) |

प्रत: ________________________________ ( जादा प्रतींसह) माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

अ आ दीक्षित

रचना व कार्यपध्दती अधिकारी

(म.न.पा. आयुक्तांचे कार्यालय)

User 8 C:\MOM\Circular.doc